| MHNS230009492019 | सं.फौ.ख.क्र. ५७६/२०१९<br>शासन वि. शाम चव्हाण<br>निशाणी क्रमांक. ८ |
|---|---|

# न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ८ जून २०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ३ सह कलम २५ व मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१) च्या अपराधाकरीता चालवण्यात आला. अभियोग पक्षाच्या कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थी आले व त्यावरील निष्कर्ष मी थोडक्यात कारणांसहीत खालीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| **१.** दि. १६.०५.२०१८ रोजी २३.०० वाजेच्या सुमारास घोटी, साईकृपा हॉटेलजवळ, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथे आरोपी हा विनापरवाना बेकायदेशीररीत्या एक धारदार तलवार त्याचे ताब्यातील इंडीका कार क्र.एम.एच.१८.एस. १०१५ हिचे पाठीमागील डिक्कीत ठेवून स्वतःचे कब्जात बाळगतांना मिळून आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | : **नकारार्थी** |
| **२.** मुद्दा क्रमांक १ मधील तारीख, वेळी व ठिकाणी संपुर्ण नाशिक जिल्ह्यात मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे जमावबंदी आदेश लागू असतांना देखील आरोपी हा आदेशाचा भंग करतांना मिळून आला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | : **नकारार्थी** |
| **३.** आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

**सं.फौ.ख.क्र. ५७६/२०१९**
**शासन वि. शाम**
**निशाणी क्रमांक ८**

**<u>पटलावरील पुरावा</u>**

२. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्रमांक १. पांडुरंग मुरलीधर चव्हाण यांची साक्ष नि.क्र.१० व साक्षीदार क्र.२ गणेश बबन सोनवणे यांची साक्ष नि.क्र.१७ वर नोंदविली. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये निवेदन **नि.क्र.२२** वर नोंदविण्यात आले. सरकारी विधिज्ञ व आरोपीचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ करिता :</u>**

३. अभियोगपक्षाने सदर प्रकरणात दोन साक्षीदार साक्षीदार क्रमांक १. पांडुरंग मुरलीधर चव्हाण व साक्षीदार क्र.२ गणेश बबन सोनवणे यांची साक्ष नोंदविली. परंतू साक्षीदार क्र.१ पांडुरंग चव्हाण फितुर झाल्याने त्याची साक्ष अभियोगपक्षास सहाय्य करु शकली नाही. अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्याचा उलटतपास घेतला परंतु, त्यातुन देखील कुठलाही सहाय्यकारी पुरावा अभिलेखावर येऊ शकला नाही.

४. साक्षीदार क्र.२ गणेश बबन सोनवणे यांनी त्यांचे साक्षीपुराव्यात असे सांगितले की, सन २०१४ ते २०२० पर्यंत ते पोलीस स्टेशन घोटी येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत असून दि. १६/०५/२०१८ रोजी रात्री सव्वादहा वाजताच्या सुमारास त्यांना, पी.एस.आय. माळी, पी.एस.आय. घिसाडी, पो.हवा. पारधी, पो.ना. पाटील, पो.ना.गायकवाड, पो.ना.दोंदे, पो.ना.जगताप, पो.शि.सानप, पो.शि.कोकाटे अशांना स.पो.नि. भालेराव यांनी कॅबिनमध्ये बोलवून घोटी टोल नाक्यावर हॉटेल साईकृपा हॉटेलसमोरील सिल्व्हर रंगाची इंडिका क्र.एम.एच.१८/एस.१०१५ या

संं.फौ.ख.क्र. ५७६/२०१९
शासन वि. शाम
निशाणी क्रमांक ८

गाडीमध्ये एक इसम आहे व त्या गाडीत तलवार आहे त्याची खात्री करुन त्यावर कायदेशिर कारवाई करा असे सांगितले. त्यानंतर ते २२.३६ वाजता घोटी टोलनाका येथे गेले असून तेथे साईकृपा हॉटेलसमोरील उभ्या असलेल्या सर्व वाहनांची तपासणी केली. तेथे सिल्व्हर रंगाची एक इंडिका गाडी क्र.एम.एच.१८/एस.१०१५ ही उभी असून त्यात एक इसम बसलेला होता. ते सर्व व दोन पंच तेथे गेले व रात्री ११.०० वाजता छापा टाकला. गाडीत बसलेल्या इसमाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव श्याम बळवंत चव्हाण असे सांगितले तसेच त्याच्या गाडीची तपासणी केली असता त्याच्या गाडीच्या डिक्कीत एक लोखंडी पात्याची धारदार दोन फुट आठ इंच लांबीची व एक इंच रुंदीची तलवार मिळून आली. तलवारीची मुठ नक्षीदार पितळीची होती व ती तलवार लाल रंगाच्या वेल्वेटच्या कपड्याच्या मॅनीत ती तलवार होती. बातमीप्रमाणे खात्री झाल्याने पी.एस.आय. आनंदा माळी यांनी घटनास्थळी पंचनामा केला. त्यानंतर आरोपी, गाडी तसेच तलवार ताब्यात घेतली. त्यानंतर पोलीस स्टेशन घोटी येथे येउन घटनेची फिर्याद दिली. घटनेच्या वेळेस जमावबंदीचे आदेश लागू होते. सदर साक्षीदाराने फिर्याद नि.क्र.१८ वर, एफ.आय. आर. नि.क्र.१९ वर व जप्त केलेली तलवार जिचा जी.एम.आर.क्र. ७५/२०२१ ही आर्टीकल–अ वर सिद्ध केली.

उलटतपासात त्यांनी हे मान्य केले की, सदर प्रकरणात तपासी अधिका–यांनी त्यांचे जबाब नोंदविले नाही तसेच त्यांनी फिर्याद दाखल केल्यानंतर तपासी अधिका–यांनी त्यांची सदर प्रकरणात विचारपूस केली नाही. छापा टाकण्यापुर्वी त्यांनी स्वतःच्या अंगझडतीचा पंचनामा केला नाही. पुढे त्यांनी हे मान्य

केले की, त्यांनी ज्या वाहनांची पाहणी केली त्यांच्या क्रमांकाची नोंद घेतली नाही तसेच तथाकथित तलवार गाडीत मिळाल्याबाबतचे घटनास्थळी कोणतेही फोटो त्यांनी स्वतः किंवा इतर पोलीस कर्मचा–यांनी घेतले नाही व छापा टाकला तेव्हा गाडीच्या मालकीसंदर्भात कोणतेही दस्तऐवज त्यांना प्राप्त झाले नाही.

५. अभियोगपक्षाने तपासलेल्या सर्व साक्षीदारांच्या पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र.१ पांडुरंग मुरलीधर चव्हाण फितूर झाल्याने त्यांची साक्ष ग्राहय धरण्यात आली नाही. त्यामुळे पंचनामा सिद्ध होवून शकला नाही. सबब्, आरोपीच्याच ताब्यातून तथाकथित तलवार जप्त झाली हे सिद्ध झाले नाही. साक्षीदार क्रमांक २. नितीन कस्तुरे याच्यो पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरणात तपासी अधिका–यांनी त्यांचे जबाब नोंदविले नाही तसेच त्यांनी फिर्याद दाखल केल्यानंतर तपासी अधिका–यांनी त्यांची सदर प्रकरणात विचारपूस केली नाही. छापा टाकण्यापुर्वी त्यांनी स्वतःच्या अंगझडतीचा पंचनामा केला नाही. पुढे त्यांनी हे मान्य केले की, त्यांनी ज्या वाहनांची पाहणी केली त्यांच्या क्रमांकाची नोंद घेतली नाही तसेच तथाकथित तलवार गाडीत मिळाल्याबाबतचे घटनास्थळी कोणतेही फोटो त्यांनी स्वतः किंवा इतर पोलीस कर्मचा–यांनी घेतले नाही व छापा टाकला तेव्हा गाडीच्या मालकीसंदर्भात कोणतेही दस्तऐवज त्यांना प्राप्त झाले नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत, तथाकथित गाडीतच तथाकथित हत्यार मिळून आले किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण होतो. शिवाय अभियोग पक्षाला वारंवार संधी देवून सुध्दा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथेवर संशय निर्माण होतो.

सं.फौ.ख.क्र. ५७६/२०१९
शासन वि. शाम
निशाणी क्रमांक ८

त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषारोपीत केलेले गुन्हे रास्त शंके पलीकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे मी **मुद्दे क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी** नोंदवुन, **मुद्दा क्रमांक ३** च्या उत्तरादाखल पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी **शाम बळवंत चव्हाण** याची भारतीय हत्यार कायदा कलम ३ सह कलम २५ व मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१) खालील आरोपांमधुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **२.** | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७– अ च्या पुर्ततेसाठी आरोपीच्या जुन्या जमानती व बंधपत्रांचा कालावधी पूढील सहा महिण्यांकरीता वाढविण्यात येत आहे. |
| **३.** | जप्त मूद्देमाल एक टाटा कंपनीची इंडीका कार क्र.एम.एच.१८.एस. १०१५ ही त्याच्या योग्य मालकास दिलेले नसल्यास त्याचा ताबा मिळण्यासाठी त्याचे योग्य मालकाने अपील कालावधीनंतर कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करावा. जर ते पुर्वीच अंतरिम ताब्यावर त्याच्या योग्य मालकास दिलेले असल्यास सदरहू अंतरिम ताबा अपील कालावधी नंतर कायम करण्यात यावा. एक लोखंडी पात्याची तलवार जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे नियमानुसार विल्हेवाटेकरिता अपिल कालावधीनंतर पाठविण्यात यावी. |
| | (सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Digitally signed by RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Date: 2026.06.08 14:52:50 +0530

**(आर. यु. इंगळे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्या.क्र.२,)**
**इगतपुरी.**

**दिनांक : ०८.०६.२०२६**

**सं.फौ.ख.क्र. ५७६/२०१९**
**शासन वि. शाम**
**निशाणी क्रमांक ८**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस.आर.भापकर
कार्यालयाचे नाव –प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, इगतपुरी.
दिनांक – ०८/०६/२०२६.

**स्वा/–**
**लघुलेखक**